# विद्यापीठ परिसरात १२३ पृष्ठवंशीय प्रजातींची नोंद

## ९० पक्षी, १३ सरिसृप, ११ उभयचर, ९ सस्तन प्रजातींचा समावेश; डॉ. गायकवाड यांचे संशोधन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या 'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम' अंतर्गत प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. एस. एम. गायकवाड यांना मंजूर प्रकल्पांतर्गत गेल्या वर्षभरात विद्यापीठ परिसरात १२३ पृष्ठवंशीय पशुपक्ष्यांच्या प्रजातींची नोंद झाली आहे. याचा संशोधन अहवाल विद्यापीठास सादर झाला असून विद्यापीठ परिसरात मोठी जैवविविधता असल्याचे स्पष्ट झाले आहे.

'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम' विद्यापीठाने अधिविभागातील संशोधकांसाठी घोषित केलेली महत्त्वाची योजना आहे. योजनेंतर्गत 'स्टडिज ऑन डायव्हर्सिटी ऑफ व्हर्टिब्रेटस् इन द शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस' हा प्रकल्प डॉ. गायकवाड यांना मंजूर झाला होता. त्यांनी विद्यापीठ परिसरात वर्षभर सातत्यपूर्ण पाहणी करून विविध पृष्ठवंशीय प्राणी व पक्ष्यांच्या नोंदी घेतल्या.

सरिसृप वर्गाच्या १३ प्रजाती विद्यापीठात आढळून आल्या. त्यात सापांच्या सहा प्रजाती आढळल्या. तस्कर (कॉमन ट्रिंकेट स्नेक) दुर्मीळ प्रजातीचा साप परिसरात आढळला. त्याशिवाय सरडे व पालींच्या सहा प्रजाती व कासवाची एक प्रजात आढळून आली. विद्यापीठ परिसरात पक्ष्यांच्या ९० प्रजाती आढळल्या आहेत. गरूडाच्या बोनेल्स ईगल व क्रेस्टेड सर्पंट ईगल या दोन प्रजाती आढळल्या. अन्य शिकारी पक्ष्यांच्या आठ प्रजाती आढळल्या आहेत. उभयचर प्राण्यांच्या ११ प्रजाती विद्यापीठ परिसरात आढळल्या. त्यात बेडकांच्या दहा प्रजाती आढळल्या. बलून फ्रॉग दुर्मीळ बेडकाची नोंद झाली आहे. सस्तन प्राण्यांच्या ९ प्रजाती नोंदविण्यात आल्या असून वटवाघळाच्या तीन प्रजातींसह साळिंदराच्या एका प्रजातीची नोंद झाली आहे.



ब्राह्मणी बदक



स्वर्गीय नर्तक




क्रेस्टेड सर्पंटाईन ईगल



छोट्या कंठाचा चिखल्या



बलून फ्रॉग



कॉमन ट्रिंकेट स्नेक



"विद्यापीठाचा परिसर जैवविविधतेने समृद्ध असल्याची प्रचिती प्रकल्पाचे काम करताना आली. संशोधनाचा अहवाल विद्यापीठास सादर केला आहे. भविष्यात यासंदर्भात व्यापक संशोधन करण्याचा मानस आहे.

**- डॉ. एस. एम. गायकवाड**, प्रकल्प संशोधक

"रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम विद्यापीठातील संशोधकांना उपयुक्त संशोधनासाठी प्रेरित करणारी योजना आहे. विद्यापीठाचा परिसर जैवविविधतेने समृद्ध असल्याचा संशोधनाने नेमकेपणाने प्रकाशझोत टाकला आहे. भविष्यात अशा उपयुक्त संशोधनांना विद्यापीठ बळ देईल.

**- डॉ. डी. टी. शिर्के,**
कुलगुरू

# विद्यापीठ परिसरात १२३ पृष्ठवंशीय प्रजातींची नोंद

## ९० पक्षी, १३ सरिसृप, ११ उभयचर, ९ सस्तन प्रजातींचा समावेश; डॉ. गायकवाड यांचे संशोधन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या 'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम'अंतर्गत प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. एस. एम. गायकवाड यांना मंजूर प्रकल्पांतर्गत गेल्या वर्षभरात विद्यापीठ परिसरात १२३ पृष्ठवंशीय पशुपक्ष्यांच्या प्रजातींची नोंद झाली आहे. याचा संशोधन अहवाल विद्यापीठास सादर झाला असून, विद्यापीठ परिसरात मोठी जैवविविधता असल्याचे स्पष्ट झाले आहे.

'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम' ही विद्यापीठाने अधिविभागातील संशोधकांसाठी घोषित केलेली महत्त्वाची योजना आहे. योजनेंतर्गत 'स्टडीज ऑन डायव्हर्सिटी ऑफ व्हर्टिब्रेट्स इन द शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस' हा प्रकल्प डॉ. गायकवाड यांना मंजूर झाला होता. त्यांनी विद्यापीठ परिसरात वर्षभर सातत्यपूर्ण पाहणी करून विविध पृष्ठवंशीय प्राणी व पक्ष्यांच्या नोंदी घेतल्या.



ब्राह्मणी बदक



स्वर्गीय नर्तक




क्रेस्टेड सर्पंटाईन ईगल



छोट्या कंठाचा चिखल्या



बलून फ्रॉग



कॉमन ट्रिंकिट स्नेक

सरिसृप वर्गाच्या १३ प्रजाती विद्यापीठात आढळून आल्या. त्यात सापांच्या सहा प्रजाती आढळल्या. तस्कर (कॉमन ट्रिंकेट स्नेक) दुर्मीळ प्रजातीचा साप परिसरात आढळला. त्याशिवाय सरडे व पालींच्या सहा प्रजाती व कासवाची एक प्रजात आढळून आली. विद्यापीठ परिसरात पक्ष्यांच्या ९० प्रजाती आढळल्या आहेत. गरुडाच्या बोनेल्स ईगल व क्रेस्टेड सर्पंटाईन ईगल या दोन प्रजाती आढळल्या. अन्य शिकारी पक्ष्यांच्या आठ प्रजाती आढळल्या आहेत. उभयचर प्राण्यांच्या ११ प्रजाती विद्यापीठ परिसरात आढळल्या. त्यात बेडकांच्या दहा प्रजाती आढळल्या. बलून फ्रॉग दुर्मीळ बेडकाची नोंद झाली आहे. सस्तन प्राण्यांच्या ९ प्रजाती नोंदविण्यात आल्या असून, वटवाघळाच्या तीन प्रजातींसह साळिंदराच्या एका प्रजातीची नोंद झाली आहे.

> रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम विद्यापीठातील संशोधकांना उपयुक्त संशोधनासाठी प्रेरित करणारी योजना आहे. विद्यापीठाचा परिसर जैवविविधतेने समृद्ध असल्याचा संशोधनाने नेमकेपणाने प्रकाशझोत टाकला आहे. भविष्यात अशा उपयुक्त संशोधनांना विद्यापीठ बळ देईल.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू



> प्रकल्पाचे काम करताना विद्यापीठाचा परिसर जैवविविधतेने समृद्ध असल्याची प्रचिती आली. संशोधनाचा अहवाल विद्यापीठास सादर केला आहे. भविष्यात यासंदर्भात व्यापक संशोधन करण्याचा मानस आहे.
>
> **- डॉ. एस. एम. गायकवाड,** प्रकल्प संशोधक

# शिनोळी शैक्षणिक संकुलातील कोर्सला मान्यता

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाचे सीमाभागातील शैक्षणिक संकुल नव्या शैक्षणिक वर्षात सुरू होणार आहे, या ठिकाणी सुरू करण्यात येणाऱ्या प्रमाणपत्र कोर्सला व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळाली. आज विद्यापीठात व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली.

शिनोळी (ता. चंदगड) येथे किमान कौशल्य प्रमाणपत्र कोर्सेस सुरु करण्यास व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीत ३६ विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरु डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह व्यवस्थापन परिषद डॉ. भारती पाटील, डॉ. आर.जी.कोरबू, डॉ. पी. आर. शेवाळे, अमित कुलकर्णी आदी उपस्थित होते.


## जाहीर इशारा वजा नोटीस

आमचे अशिल श्री. प्रविण शंकर यादव, रा. प्लॉट नं.२९, न्यू मोरे कॉलनी, कोल्हापूर यांनी दिले माहितीवरुन व दाखविले कागदपत्रांवरुन तमाम लोकांना कळविणेत येते की, मौजे नेबापूर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील भूमापन गट क्रमांक १०२ एकूण क्षेत्र हे.०.२२ आर पो.ख. हे.०.४६ आर ही संपूर्ण जमीन मिळकतीबाबत सदर आमचे अशिलांनी कोल्हापर येथील मे. दिवाणी न्यायाधीशसो. वरिष्ठ स्तर यांचे

# सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी ‘किमान कौशल्य अभ्यासक्रम’

## शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी शिनोळी (ता. चंदगड) येथे उभारण्यात येणाऱ्या शैक्षणिक संकुलात किमान कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू होणार आहे. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत प्रावीण्य मिळविणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या ‘स्पोर्ट अवॉर्ड’च्या रकमेत शिवाजी विद्यापीठाने तिप्पटीने वाढ केली. याबाबतच्या ठरावांना विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने शुक्रवारी मान्यता दिली.

व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के होते. बोर्ड ऑफ स्पोर्ट अवॉर्डअंतर्गत प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना अनुक्रमे तीन हजार, अडीच हजार, दोन हजार रुपये बक्षीस देण्यात येते. या रकमेत वाढ करण्याची शिफारस वित्त व लेखा समितीने केली होती. त्यानुसार आता या विजेत्यांना अनुक्रमे दहा हजार, साडेसात हजार आणि पाच हजार रुपये बक्षीस म्हणून देण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. विद्यापीठाच्या विदेशी भाषा अधिविभागात पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

# मंत्री सामंत घेणार विद्यापीठाचा आढावा

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठात सोमवारी (ता. २५) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत येणार आहेत. शिक्षण विभाग आपल्या दारी या उपक्रमात ते सहभागी होणार आहेत. या उपक्रमाची जोरदार तयारी विद्यापीठात सुरू आहे. अधिकाधिक महाविद्यालये, विद्यार्थी, शिक्षक यांना यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

शिवाजी विद्यापीठाने शिक्षण विभाग आपल्या दारी उपक्रमाचे आयोजन केले आहे. या अंतर्गत मंत्रालयापासून ते स्थानिक कार्यालयातील अधिकारी विद्यापीठात सोमवारी (ता.२५) सकाळी ११ वाजता उपस्थित राहाणार आहेत व तक्रारींचे निवारण करणार आहेत. या उपक्रमाची विद्यापीठाने युद्धपातळीवर तयारी सुरू केली आहे. यासाठी स्वतंत्र पोर्टल सुरू केले असून यावर तक्रारी द्यायच्या आहेत.

# ‘उच्च शिक्षण मंत्रालय @कोल्हापूर’ उपक्रमाची वेगाने तयारी

कोल्हापूर : उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी ‘उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय आपल्या विभागात’ हा उपक्रम जाहीर केला आहे. त्याची सुरुवात सोमवारी (दि. २५) सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठामध्ये ‘उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय @कोल्हापूर’ने होणार आहे. त्याची विद्यापीठात वेगाने तयारी सुरू आहे.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणाऱ्या या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यापीठ प्रशासनाने विविध समित्या स्थापन करून काम सुरू केले आहे. विद्यापीठाने निवेदने स्वीकारण्यासाठी स्वतंत्र पोर्टल निर्माण केले आहे. या उपक्रमास उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त आदी उपस्थित असणार आहेत.

# कालानुरूप सुसंगत मूल्यमापन पद्धती अंगीकारावी : डॉ. शिर्के

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : कोविड महामारीसारख्या आपत्ती मानवी इतिहासात येत-जात राहतील. यातून तयार होणाऱ्या परिस्थितीला सामोरे जात शैक्षणिक समुदायाने मूल्यमापन पध्दतीत सुसंगत बदल अंगीकारुन समर्थपणे मार्गक्रमण करावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.डी.टी. शिर्के यांनी केले. ते महावीर महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष तसेच टिचर एज्यूकेटर ॲपमार्फत आयोजित 'एक्झामिनेशन रिफॉर्मस इन पोस्ट पँडॅमिक इंडिया' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय वेबीनारप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते.

प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे यांनी स्वागत केले. वेबिनारच्या निमंत्रक प्रा.डॉ. एम. एस. पदमिनी यांनी या वेबिनारच्या विषयाची माहिती सांगितली. डॉ.शिर्के म्हणाले की, 'महामारीसारख्या आपत्तीशी मुकाबला करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना शिक्षण व्यवस्थेने करायला हवी. याकरिता निष्पत्ती आधारीत शिक्षण पध्दतीचा स्वीकार व्हावा व त्याची अंमलबजावणी करावी.' याप्रसंगी अरुणाचल प्रदेशातील राजीव गांधी केंद्रीय विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. साकेत कुशवाहा आणि म्हैसुर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.जी. हेमंतकुमार यांनी मनोगत व्यक्त केले.

# शिवाजी विद्यापीठाकडून लाभलेले प्रेम अविस्मरणीय

## परदेशी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली भावना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणासाठी दाखल होत असताना मनात अनेक संमिश्र भावना होत्या; मात्र विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरात जीव गुंतला. चांगली माणसेही भेटली. काळ लोटला तसतसे इथल्या विविध घटकांकडून मिळालेले प्रेम, निर्माण झालेले आपुलकीचे बंध अविस्मरणीय आहेत, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागांतून पदव्युत्तर शिक्षण घेऊन बाहेर पडत असलेल्या परदेशी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागांत २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात विविध देशांतील विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेशित झाले. हे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आणि नव्या विद्यार्थ्यांचे स्वागत असा संयुक्त कार्यक्रम विद्यापीठ कार्यालयात पार पडला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

यावेळी सदर विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांसमवेत दिवाळीसह विविध सण साजरे केल्याच्या आठवणींबरोबरच कोविड-१९ च्या कालखंडात स्वतःच्या घरापासून दूर असलेल्या आम्हा विद्यार्थ्यांची अत्यंत आपुलकीच्या भावनेतून काळजी वाहिली, त्याबद्दल कृतज्ञताही व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी त्यांच्या भावी जीवनातील यशस्वितेसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रंथभेट व विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह त्यांना प्रदान करण्यात आले.

यावेळी विविध अधिविभागांचे प्रमुख तसेच शिक्षकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. यामध्ये आयक्यूएसी संचालक प्रा. एम. एस. देशमुख, एस. एस. महाजन, के. डी. सोनवणे, जी. एस. राशीनकर, ए. एम. गुरव, डॉ. ए. डी. जाधव, डॉ. मेघा पानसरे, डॉ. के. के. शर्मा, डॉ. व्ही. वाय. धुपदाळे आदींचा समावेश होता. सुरुवातीला इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक ए. व्ही. घुले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील निरोप समारंभात परदेशी विद्यार्थ्यांच्या समवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.

# विद्यापीठाशी जडले आपुलकीचे नाते

## निरोप समारंभात परदेशी विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या भावना

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणासाठी दाखल होत असताना मनात संमिश्र भावना होत्या. मात्र, विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरात जीव गुंतला. चांगली माणसेही भेटली. इथल्या विविध घटकांकडून मिळालेले प्रेम, निर्माण झालेले आपुलकीचे बंध अविस्मरणीय आहेत, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागांतून पदव्युत्तर शिक्षण घेऊन बाहेर पडत असलेल्या परदेशी विद्यार्थ्यांनी भावना व्यक्त केल्या.

विद्यापीठातील विविध अधिविभागांत २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात विविध देशांतील विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेशित झाले. शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आणि नव्या विद्यार्थ्यांचे स्वागत, असा संयुक्त कार्यक्रम विद्यापीठ कार्यालयात झाला. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी तर प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

कोविडच्या कालखंडात घरापासून दूर असलेल्या विद्यार्थ्यांची अत्यंत आपुलकीच्या भावनेतून काळजी वाहिली, त्याबद्दल कृतज्ञताही व्यक्त केली. या वेळी डॉ. जे. बी. यादव, प्रा. एम.एस. देशमुख, प्रा. एस. एस. महाजन, प्रा. के. डी. सोनवणे, प्रा. जी. एस. राशीनकर, प्रा. ए. एम. गुरव, डॉ. ए. डी. जाधव, डॉ. मेघा पानसरे, डॉ. के. के. शर्मा, डॉ. व्ही. वाय. धुपदाळे उपस्थित होते.